**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:-सनित-१६२५/प्र.क्र.९०/१३-स
सहकार विभाग ,
मंत्रालय, विस्तारीत इमारत,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २७ ऑक्टोबर, २०२६

<u>**संदर्भ**</u> :- १. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय दि. २५/०९/२०२६
२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय दि. १४/१०/२०२६

राज्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रकिया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कब मधील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राबविण्यात येते.

दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ नुसार खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्यात आले असून, आयुक्त, कृषी यांच्या अहवालानुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये Trigger-१ (प्रथम कळ) लागू झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने पंचनामे व पिक सर्वेक्षणाची कार्यवाही सुरू करण्याबरोबरच जमीन महसुलात सूट, पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालु वीजबिलात सूट, शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमी योजनेंतर्गत जास्तीत जास्त कामे सुरु करणे, पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडित न करणे, शेतकरी व शेतमजूर यांना अन्य धान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था करणे, जनावरांना चारा उपलब्ध करून देणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे इत्यादी विविध उपाययोजना व सवलती शासनाने संदर्भ क्र. १ अन्वये लागू केल्या आहेत.

त्यानंतर खरीप २०२६ च्या हंगामातील परिस्थतीच्या आधारे पर्जन्यातील तुट व अन्य घटकांनी प्रभावीत झालेल्या तालुक्यातील Trigger-१ (प्रथम कळ) व Trigger-२ (दुसरी कळ) बाबत प्राप्त झालेल्या माहितीनुसार शासनाने संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयाद्वारे ३०४ तालुके दुष्काळी तालुके म्हणून जाहिर केले आहेत.

सदर ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे दुष्काळ निवारण व मदतकार्याशी संबंधित विविध उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी महसूल, कृषी, पशुसंवर्धन, सहकार, ग्रामविकास, पाणीपुरवठा, जलसंधारण तसेच अन्य संबंधित विभागांवर अतिरिक्त प्रशासकीय जबाबदारी निर्माण झाली आहे.

अशा परिस्थितीत सदर तालुक्यांमधील सहकारी संस्थांची निवडणुक प्रक्रिया चालु ठेवल्यास त्यासाठी शासकीय अधिकारी / कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत गुंतण्याची शक्यता असून, त्याचा दुष्काळ निवारण व मदतकार्याच्या कार्यवाहीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच, दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी व सभासद यांना सद्यस्थितीत सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणे गैरसोयीचे ठरण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार टंचाई, अवर्षण, पुर, आग किंवा इतर कोणत्याही नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाळा यामुळे किंवा टंचाई, अवर्षण, पुर, आग, गारपीट किंवा इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी, शेतमजुर किंवा इतर व्यक्ती बाधित झाल्यामुळे मतदारांच्या संख्येत घट झाल्याने आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी केलेल्या कोणत्याही शासकीय योजनेच्या अमंलबजावनीमुळे मतदारांची संख्या वाढण्याचा संभव असल्यामुळे राज्य शासनाच्या मते सहकारी संस्थांची निवडणूक घेणे लोकहिताचे नसेल अशा बाबतीत राज्य शासनास सर्व साधारण किंवा विशेष आदेशाद्वारे सहकारी संस्थांची निवडणूक पुढे ढकलण्याचा अधिकार आहे. शासनास प्राप्त असलेल्या अधिकारानुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करून सहकारी संस्थांची निवडणूक पुढे ढकलण्याबाबत शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त विवेचन विचारात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३कक मधील तरतुदीनुसार सद्यस्थितीत राज्यात शासनाने दुष्काळी परिस्थिती जाहिर केल्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच ज्या प्रकरणी मा. उच्च न्यायालय / मा. सर्वोच्च न्यायालयाने सहकारी संस्थेची निवडणूक घेण्याबाबत आदेशीत केले आहे अशा सहकारी संस्था वगळून तसेच ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूकीचा नामनिर्देशनाचा टप्पा सदर आदेशाच्या दिनांकापूर्वी सुरु झाला आहे अशा सहकारी संस्था वगळून शासनाने दुष्काळ जाहिर केलेल्या जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांची निवडणुक सध्या ज्या टप्प्यावर आहे त्या टप्प्यावरुन या आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेशापर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक २०२६१०२७२११०२०२०४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB176442575037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.10.27 21:11:55 +05'30'

**(संतोष पाटील)**
**अपर निबंधक तथा सह सचिव**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी:-**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पूणे.
३. जिल्हाधिकारी (सर्व)
४. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
५. प्रादेशिक सह संचालक, साखर (सर्व)
६. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
७. उप / सहायक निबंधक, सहकारी संस्था (सर्व)
८. निवडनस्ती, कार्यासन १३-स.